महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ४३ वे | दिनांक : ०३/०२/२०२६ | वार : मंगळवार

## अजित पवार-जयंत पाटलांमधील बैठकीचा तपशील समोर



**मुंबई :** दोन्ही राष्ट्रवादी गटांच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत पडद्यामागे काय चर्चा झाली होती, याचे काही तपशील समोर आल्याने राजकीय वर्तुळात नव्याने खळबळ उडाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, विलीनीकरणानंतर एकत्रित पक्षाने महायुतीत सहभागी व्हावे, असा प्राथमिक आराखडा चर्चेत होता. या आराखड्यात केंद्रात सुप्रिया सुळे यांना मंत्रिपद आणि राज्य मंत्रिमंडळात शरद पवार गटातील एका नेत्याला स्थान देण्याचा प्रस्ताव मांडला गेला होता. तसेच, एकत्र येणाऱ्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाबाबत अंतिम निर्णय शरद पवार घेतील, अशी रूपरेषा अजित पवार आणि जयंत पाटील यांच्या बैठकीत चर्चिल्याचे सांगितले जाते.

यातील मिळालेल्या माहितीनुसार सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रिपद तर जयंत पाटील यांना राज्यात मंत्रिपद देण्यात येणार होते. तर रोहित पवार यांनाही राज्यात राज्यात राज्यमंत्री पद देण्यात येणार होते. इतकेच नाही तर नवीन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष पद हे खासदार अमोल कोल्हे यांच्याकडे सोपवण्यावर एकमत झाले होते. केंद्राची संपूर्ण जबाबदारी सुप्रिया सुळेंवर तर राज्यातील संपूर्ण जबाबदारी अजित पवारांकडे राहिल, असेही निश्चित झाले होते, अशी माहिती समोर आली आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर या चर्चांना अधिक वेग आला. शरद पवार गटातील नेत्यांनी दोन्ही राष्ट्रवादींमध्ये विलिनीकरणाची अंतिम चर्चा झाल्याचा दावा केला. त्यासाठी जयंत पाटील यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीचा उल्लेख करण्यात येत आहे. या बैठकीत पुढील राजकीय दिशा ठरवण्याबाबत सविस्तर चर्चा झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

मुंबईतील जयंत पाटील यांच्या घरी २३ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत शरद पवार गटातील सुमारे १४ नेते उपस्थित होते आणि अजित पवार यांच्यासोबत जवळपास अडीच तास चर्चा झाली, अशी माहिती समोर आली आहे. या चर्चेत दोन्ही गटांनी एकत्र येऊन महायुतीत सहभागी होण्याचा पर्याय गांभीर्याने विचारात घेतल्याचे सांगितले जाते. या प्रस्तावात केंद्र आणि राज्यातील मंत्रिपदांची शक्यता, तसेच संघटनात्मक निर्णयप्रक्रियेची रूपरेषा यांचा समावेश होता.

या आधी कराड येथे अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात स्वतंत्र बैठक झाल्याचीही माहिती दिली जाते. सूत्रांच्या म्हणण्यानुसार, अजित पवार स्वतःच चर्चेची सूत्रे हाताळत होते, तर शरद पवार यांच्या बाजूने प्रमुख नेते चर्चेत सहभागी होत होते. विलिनीकरणानंतर पक्षरचना कशी असेल, निर्णयप्रक्रिया कोणाकडे असेल आणि महायुतीत जाण्याबाबतची भूमिका काय असेल, या मुद्द्यांवर चर्चा केंद्रित होती.

दरम्यान, या चर्चांची माहिती अजित पवार गटातील काही वरिष्ठ नेत्यांना नव्हती, असा दावा केला जात आहे. प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांना याबाबत माहिती झाल्यास काय होईल, असा प्रश्न उपस्थित झाला असता, मी पक्ष चालवतोय, मी बघून घेईन, अशा शब्दांत अजित पवारांनी ठाम भूमिका व्यक्त केल्याचे सांगितले जाते. यामुळे चर्चेची संवेदनशीलता आणि गोपनीयता अधोरेखित होत असल्याचे मानले जाते.

मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या गटाकडून या सर्व दाव्यांना फेटाळण्यात येत आहे. विलिनीकरणाबाबत कोणतीही अंतिम चर्चा झाली नव्हती, अशी भूमिका त्या गटातील नेते मांडत आहेत. या पार्श्वभूमीवर राजकीय आरोप-प्रत्यारोपांना अधिक धार आली आहे. शरद पवार गटाच्या दाव्यांमुळे आणि त्यावर येणाऱ्या प्रतिक्रियांमुळे राष्ट्रवादीतील अंतर्गत घडामोडी पुन्हा चर्चेत आल्या आहेत.

## राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत भाजपला विचारावे लागेल - छगन भुजबळ



**नाशिक :** दोघे ठाकरे जसे एकत्र आले तसे पवार एकत्र यावे, असे विधान मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. तसेच ते म्हणाले की अशा काही चर्चा झाल्या नाहीत असे मुख्यमंत्र्यांनी देखील सांगितले. माझ्याशी कधीही हे बोलले नाही, कल्पनाही नाही. तसेच दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण करायचे असेल तर भाजपला विचारावे लागेल, असेही भुजबळ यांनी म्हटले आहे. त्यांनी केलेल्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

दिवंगत नेते तथा माजी मुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थी कलशाचे विविध जिल्ह्यात दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली जात आहे. नाशिक जिल्ह्यातील येवला येथे छगन भुजबळ यांच्या कुटुंबीयांनी अजित पवारांना आदरांजली वाहिली. तत्पूर्वी भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेत विविध प्रश्नांवर भाष्य केले आहे. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावर देखील त्यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विलीनीकरणाबाबत जे काही करायचे ते आम्हाला भाजपसोबत राहून करायचे आहे. असे काही करायचे असेल तर त्याबाबत आम्हाला भाजपला विचारावे लागेल. कोणाला घ्यायचे, कोणाला नाही घ्यायचे याबाबत भाजपचे जे काही ज्येष्ठ मंडळी आहेत, त्यांनाही विचारावे लागेल. काय बोलणे झाले हे माझ्यासह कोणालाही माहित नसल्याचे भुजबळ यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, राष्ट्रवादी पक्षाच्या विलीनीकरणासंबंधी मुख्यमंत्र्यांना तर विचारावेच लागेल. ज्यांच्याबरोबर आपण सरकारमध्ये आहोत त्यांना तर विचारावे लागेल ना. जर सरकारमधून बाहेर पडायचे असेल, एनडीएबरोबर जायचे असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. मात्र, असा विचार दादांनी केला असेल हे कदापिही आम्हाला वाटत नाही. आम्ही उपमुख्यमंत्र्यांची निवड केली, आता त्यांचे नेतृत्व आहे. त्यांच्या नेतृत्वात चर्चा होतील, कधी-कधी नाही होत, असे म्हणत सुनेत्रा पवार यांच्यासोबत या संदर्भात चर्चा होईल, असे भुजबळांनी म्हटले आहे.

## घरातील मासा मेला म्हणून सूतक पाळणारे कधीही लोकनेते होऊ शकत नाही - प्रकाश महाजन

**छत्रपती संभाजीनगर :** मी दोन भाऊ एकत्र येण्यासाठी संघर्ष केला, ते एकत्र झाले आणि मला बाहेर केले, त्यांनी मला बाहेरचा रस्ता दाखवला, हे लोकनेते होऊच शकत नाही, अशी टीका शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील देवगाव रंगारी येथे सभेत बोलताना महाजन यांनी ठाकरे बंधूंवर टीका केली. प्रकाश महाजन म्हणाले, कुत्र्याला सर्दी झाली म्हणून दुष्काळी दौरा रद्द करणारे, घरातील मासा मेला म्हणून सूतक पाळणारे कधीही लोकनेते होऊ शकत नाही, असा खोचक टोला महाजन यांनी ठाकरेंवर लगावला आहे. तसेच यावेळी बोलताना महाजन यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. एकनाथ शिंदे यांच्यात मला गोपीनाथ मुंडे यांची छबी दिसते. गोपीनाथ मुंडे देखील एकनाथ शिंदे यांच्यासारखे उशिरा यायचे. एकनाथ शिंदे यांच्याकडे लोकनेता म्हणून पाहू शकतो. लोकनेता शिंदे यांच्यासारखा असावा, असे महाजन यांनी म्हटले. पुढे बोलताना प्रकाश महाजन म्हणाले, माझे थोडे वय वाढले आहे आणि काही गोष्टी मनाविरुद्ध घडतात. त्यामुळे मी थांबायचे ठरवले आहे. माझा बाकी कोणावर राग नाही. तसेच नारायण राणेंना आव्हान देणे भोवले का? असे विचारले असता ते म्हणाले असे काहीही नाही. कुठेतरी थांबले पाहिजे. त्यामुळे मी थांबलेलो आहे. बाकी काही नाही. मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा माणूस आहे. आम्ही कधी ते लपवले नाही. मी राज ठाकरेंना घाबरत नाही. संघ विचारांचा मी माणूस आहे, शाखेत देखील जातो, असे महाजन यांनी म्हटले.दरम्यान, महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला मोठा राजकीय धक्का बसला होता. पक्षाचे आक्रमक प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी १३ सप्टेंबर रोजी आपल्या पदाचा अधिकृत राजीनामा दिला होता. गेल्या काही दिवसांपासून ते पक्षांतर्गत कारणांमुळे नाराज असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या होत्या, ज्या अखेर या राजीनाम्यामुळे स्पष्ट झाल्या. आता प्रकाश महाजन शिवसेना शिंदे गटात प्रवक्ते पदाची जबाबदारी सांभाळत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ फेब्रुवारी २०२६

## काल माझी पण बारी आली होती, थोडक्यात वाचलो - संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचाराने जोर धरला असताना, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी एका प्रचारसभेत आपल्या आयुष्यातील भीषण अपघाताचा किस्सा सांगितला."अजितदादा अचानक गेले, कुणाला वाटलं तरी होतं का? काल माझी पण बारी आली होती. तुम्ही मला आज श्रद्धांजली वाहत असता, पण थोडक्यात वाचलो," असे सांगत शिरसाट यांनी स्वत:च्या वाहनाचा घडलेला अपघाताचा किस्सा उपस्थितांना सांगितला. अजित पवार यांच्या अकाली एक्झिटचा दाखला देत त्यांनी उमेदवारांना 'टेंशन' न घेण्याचा सल्ला दिला.

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधनानंतर राजकीय वातावरण ढवळून निघाले असताना आता जिल्हा परिषदेच्या निवडणुका देखील तोंडावर आहेत. अजित पवारांच्या निधनामुळे तोंडावर असलेल्या निवडणुकांचा प्रचार देखील थंडावल्याचे दिसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील आपल्या नियोजित सभा रद्द केल्या. अशातच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी बजाजनगर येथील जिल्हा परिषदेच्या पार्श्वभूमीवर पार पडलेल्या सभेत धक्कादायक किस्सा सांगितला.

संजय शिरसाट म्हणाले, मी महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक बजेट असलेला मंत्री आहे. साडे बावीस हजार कोटींचं माझं एकट्याचं बजेट आहे. त्यावर किती झिरो असतात एकदा विचारून तर घ्या, असं संजय शिरसाट म्हणाले. एक उमेदवार आहे, तो मतदारांना फोन पे करतो म्हणाला. लोकांना मूर्ख बनवणं सोपं आहे का? गेले २० वर्ष मी आमदार आहे. पण माझ्या मतदारसंघात कुणाला वाटत नाही की मंत्री आहे.

## पैठण तालुक्यात बिडकीन येथे मंथन सामान्य ज्ञान राज्यस्तरीय परीक्षेचे यशस्वी आयोजन



**बिडकीन :** सरस्वती भुवन माध्यमिक विद्यालय बिडकीन येथे इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मंथन राज्य स्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणे, सामान्य ज्ञानाची गोडी निर्माण करणे व स्पर्धात्मक परीक्षांची ओळख करून देणे हा या परीक्षेचा मुख्य उद्देश आहे.या परीक्षेत पैठण तालुक्यातील विविध शाळांमधील 189 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. परीक्षेचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व पारदर्शक पद्धतीने करण्यात आले. परीक्षेदरम्यान केंद्रावर आवश्यक त्या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.या परीक्षेचे केंद्र संचालक म्हणून श्रीम गीता भोसले मॅडम , पर्यवेक्षक म्हणून विलास चव्हाण,शितल कुमावत, वैष्णवी आपशिंदे, सारा शेख, शिल्पा कुरुंदकर, शर्मिला चव्हाण,यांनी उत्कृष्ट नियोजन करून परीक्षा यशस्वीपणे पार पाडली. मंथन परीक्षा ही विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणारी असून भविष्यातील स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शक ठरत आहे. या परीक्षेमुळे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान संधी मिळते.सदरील परीक्षासाठी सरस्वती भुवन विद्यालयाचे मुख्याध्यापक येवले सर, अमृता काळे मॅडम, अविनाश पाटील सर, वारके मॅडम,सूर्यवंशी सर, विजय राठोड सर, मराठे सर, विठ्ठल डांगे सर, प्रतिभा पाटील मॅडम, मरबे सर, सुनील वारके सर, अश्विनी घोडके मॅडम, बुद्धिवंत पाष्टे सर,यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेत बसून मार्गदर्शन केले.

## केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ : शाश्वत शेतीकडे वाटचाल

काल देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ संसदेत सादर करण्यात आला. हा भारताचा ८० वा वार्षिक पूर्ण अर्थसंकल्प असून तो अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडला आहे. त्यांनी सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम केला असून, भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच रविवारी अर्थसंकल्प सादर होण्याची नोंद यंदा झाली. यंदाच्या अर्थसंकल्पातील कृषी क्षेत्रासाठीच्या तरतुदी पाहिल्यास सरकारचा भर केवळ थेट अनुदानांपुरता मर्यादित न राहता उत्पन्न-सुरक्षा, उत्पादनवाढ, कृषी पायाभूत सुविधा आणि नव्या शेती पद्धती यांवर केंद्रित झाल्याचे स्पष्ट दिसून येते. काल संसदेत सादर झालेल्या आकडेवारीचा आणि मागील दोन आर्थिक वर्षांतील खर्चाशी केलेल्या तुलनेचा आधार घेऊन, यंदाच्या अर्थसंकल्पाचा भारतीय शेती व्यवस्थेवर होणारा संभाव्य परिणाम या ठिकाणी मांडण्यात आला आहे.

प्रधानमंत्री फसल बीमा योजनेसाठी २०२४–२५ मध्ये ₹१४,४७३.४६ कोटी खर्च झाला होता. २०२५–२६ मध्ये ही तरतूद घटून ₹१२,२६७ कोटी झाली आणि २०२६–२७ साठी ती आणखी किंचित कमी करून ₹१२,२०० कोटी ठेवण्यात आली आहे. सलग दोन वर्षे झालेली ही घट पीक विमा योजनेवरील सरकारी खर्च स्थिरतेकडे जात असल्याचे सूचित करते. हवामान बदल, अतिवृष्टी, दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर जोखीम संरक्षणाची गरज वाढत असताना, भविष्यात या योजनेसाठी अधिक भरीव निधीची आवश्यकता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शेतकऱ्यांना स्वस्त दरात पीककर्ज उपलब्ध करून देणाऱ्या Modified Interest Subvention Scheme (MISS) साठी मात्र २०२४–२५, २०२५–२६ आणि २०२६–२७ या तीनही वर्षांत ₹२२,६०० कोटींचीच तरतूद कायम ठेवण्यात आली आहे. ही सातत्यपूर्ण तरतूद शेतकऱ्यांसाठी कर्जसुलभता टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. बँकिंग व्यवस्थेमधून कर्जपुरवठा सुलभ झाल्यास शेतीतील गुंतवणूक, आधुनिक निविष्ठांचा वापर आणि उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होऊ शकते.

किंमत संरक्षणाशी निगडित प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण योजना (PM-AASHA) साठी २०२४–२५ मध्ये ₹५,४३७.९९ कोटी खर्च झाला होता. २०२५–२६ मध्ये ही तरतूद वाढून ₹६,९४१.३६ कोटी झाली असून २०२६–२७ मध्ये ती आणखी वाढवून ₹७,२०० कोटी करण्यात आली आहे. या वाढीमुळे किमान आधारभूत किमतींच्या अंमलबजावणीला अधिक बळ मिळेल आणि बाजारातील किंमत चढउतारांपासून शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला काही प्रमाणात संरक्षण मिळण्याची शक्यता आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी २०२४–२५ मध्ये ₹६६,१२१.२० कोटी खर्च झाला होता. मात्र २०२५–२६ आणि २०२६–२७ या दोन्ही वर्षांत तरतूद ₹६३,५०० कोटी इतकीच ठेवण्यात आली आहे. म्हणजेच या थेट उत्पन्न सहाय्य योजनेचा निधी स्थिर ठेवण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नियमित आर्थिक आधार मिळत राहील, परंतु भविष्यात लाभार्थ्यांची संख्या वाढवायची असल्यास या योजनेत अतिरिक्त निधीची गरज भासू शकते.

१०,००० शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) स्थापन व प्रोत्साहनासाठी २०२४–२५ मध्ये ₹४७४.२४ कोटी खर्च झाला होता, २०२५–२६ मध्ये तो वाढून ₹५८४ कोटी झाला; मात्र २०२६–२७ मध्ये तो घटवून ₹५०० कोटी करण्यात आला आहे. सामूहिक शेती, थेट बाजार जोडणी आणि मूल्यवर्धनाच्या प्रक्रियेसाठी एफपीओ महत्त्वाच्या असताना, या तरतुदीतील घट भविष्यात या उपक्रमांच्या विस्ताराच्या गतीवर मर्यादा आणू शकते.

कृषी पायाभूत सुविधा निधी (AIF) साठी २०२४–२५ मधील ₹७२५.३४ कोटींवरून २०२५–२६ मध्ये ₹९०० कोटी आणि २०२६–२७ मध्ये ₹९१० कोटी इतकी वाढ करण्यात आली आहे. गोदामे, कोल्ड स्टोरेज, साठवणूक केंद्रे आणि प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी हा निधी उपयुक्त ठरणार असून काढणीपश्चात होणारे नुकसान कमी करणे, ग्रामीण भागात रोजगार निर्माण करणे आणि शेतमालाच्या किमती स्थिर ठेवणे या दृष्टीने याचा सकारात्मक परिणाम अपेक्षित आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात 'Support for High Value Agriculture' या नव्या घटकासाठी थेट ₹३५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. फळे, भाजीपाला, फुलशेती आणि निर्यातक्षम उत्पादनांवर लक्ष केंद्रित केल्यास शेतीतील उत्पन्न स्रोतांचे विविधीकरण होऊन शेतकऱ्यांचे सरासरी उत्पन्न वाढण्यास मदत होऊ शकते.

राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) साठी २०२४–२५ मध्ये ₹७,३८६.१४ कोटी, २०२५–२६ मध्ये ₹७,००० कोटी तर २०२६–२७ मध्ये वाढ करून ₹८,५५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. राज्यस्तरावरील कृषी प्रकल्प, सिंचन सुविधा, प्रशिक्षण आणि नवोन्मेष यांना चालना देण्यासाठी ही वाढ महत्त्वाची ठरणार आहे.

नैसर्गिक शेतीसाठी असलेल्या राष्ट्रीय मोहिमेची तरतूद २०२४–२५ मधील केवळ ₹१०.३५ कोटींवरून २०२५–२६ मध्ये ₹७२५ कोटी आणि २०२६–२७ मध्ये ₹७५० कोटींपर्यंत वाढविण्यात आली आहे. पर्यावरणपूरक शेती, मृदा आरोग्य सुधारणा आणि उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टीने ही तरतूद शेती धोरणातील महत्त्वाचा बदल दर्शविते.

कृषी क्षेत्राच्या व्यापक विकासासाठी असलेल्या कृषोन्नती योजनेसाठी २०२४–२५ मध्ये ₹५,५९९.७० कोटी, २०२५–२६ मध्ये ₹६,८०० कोटी आणि २०२६–२७ मध्ये थेट ₹११,२०० कोटी इतकी लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. विस्तार सेवा, तंत्रज्ञान प्रसार, प्रशिक्षण आणि शेतकऱ्यांच्या कौशल्यविकासासाठी हा निधी दीर्घकालीन दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरणार आहे.

सारांश, २०२६–२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात थेट उत्पन्न सहाय्य आणि कर्जसुविधा तुलनेने स्थिर ठेवत, सरकारने आपला धोरणात्मक भर कृषी पायाभूत सुविधा, नैसर्गिक शेती, उच्च मूल्य शेती आणि व्यापक विकास कार्यक्रमांकडे वळवला आहे. यामुळे अल्पकालीन मदतीपेक्षा दीर्घकालीन संरचनात्मक बदलांवर अधिक लक्ष केंद्रित केल्याचे स्पष्ट होते. जर या तरतुदींची अंमलबजावणी प्रभावीपणे आणि राज्यस्तरावरील योजनांशी समन्वय साधून झाली, तर भारतीय शेती व्यवस्थेची उत्पादकता, बाजाराशी जोड, पर्यावरणीय शाश्वतता आणि ग्रामीण रोजगारनिर्मिती यामध्ये मूलभूत सुधारणा घडू शकतात. त्यामुळे यंदाचा अर्थसंकल्प हा केवळ खर्चवाढीचा दस्तऐवज न राहता, भारतीय शेतीला अधिक सक्षम, टिकाऊ आणि स्पर्धात्मक बनवण्याच्या दिशेने नेणारा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

**लेखक- प्रा. नागार्जुन वाडेकर आणि डॉ. विशाल आंबेडकर, शेती व अर्थशास्त्राचे अभ्यासक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ फेब्रुवारी २०२६


## अद्दल

अभ्यास न करता
गेलतो मी परीक्षेला
नंबर शोधत शोधत
आठवलं देवाला

थोड्या वेळातच सरांनी
पेपर दिला हाती
अंगाला सुटला घाम
वाटत होती भीती

वेळ संपेपर्यंत
पेपर बसलो चाळत
सुचत नव्हते काही
अश्रू बसलो ढाळत

बाकीचे सर्व मित्र
पेपर सोडवी भराभरा
वर्षभर अभ्यास न केल्याने
माझा पेपर होता कोरा

अंगाचा उडाला थरकाप
दिवसा दिसू लागले तारे
मी खट्टू बसल्याने
मित्र हसू लागले सारे

अखेर नापास झाल्याने
कुणीच बसेना चूप
मनाशी पक्क ठरवलं
आता अभ्यास करायचा खूप



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९९०६

## कशाला करतो गर्व

नाशिवंत देह हा
कशाला करतो गर्व
सदा सर्वदा जगावे
वाटून देऊन सर्व. १

माणसाने माणसाशी
नित्य वागावे प्रेमाने
काम करून चांगले
वाटावे आनंद नेमाने. २

समजून घे माणसा
नाशवंत देह आहे
गर्व मनात भरून
भार उगीच तू वाहे. ३

नाशिवंत देहातूनी
काढून टाकावे गर्व
सारे येतील जवळ
विसरून दोष सर्व. ४

नाशिवंत या देहाला
जगासाठी झिजवावे
आनंदाच्या लाटेवर
निस्वार्थाने भिजवावे. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# युवाशक्तीच गावाचा विकास करू शकते - प्रा. सुखदेव मांटे



**जालना (प्रा. राजेंद्र सोनवण) :** युवाशक्तीस गावाचा विकास करू शकते. युवकांनी ठरवले तर काहीच अशक्य नाही, असे प्रतिपादन वाणिज्य शास्त्र विभागाचे प्रा.डॉ.सुकदेव मांटे यांनी केले. जेइएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि. २९ जानेवारी ते४फेब्रुवारी२०२६ दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. चौथ्या दिवशी बौद्धिक सत्रात प्राध्यापक डॉक्टर सुखदेव मांटे शाश्वत विकासामध्ये युवकांची योगदान विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी उपप्राचार्य प्रा.डॉ.महावीर सदावर्ते होते. यावेळी व्यासपीठावर प्रा. आनंद कुलकर्णी , प्रा. मगरे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा. डॉ सुखदेव मांटे म्हणाले की गावातील नदी ,नाल्यावर पाणी अडवून गावाचा विकास युवकच करू शकतात ,या पाण्याचा फायदा सिंचनासाठी होऊ शकतो यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते.गावात सधनता येऊ शकते, युवकांनी ठरवले तर त्यांना काही अशक्य नाही, युवकच गावचा विकास करू शकतात. असेही प्रा. मांटे यांनी सांगितले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य महावीर सदावर्ते म्हणाले की, देशाचा शाश्वत विकास युवाशक्तीस करू शकते. युवकांनी ठरवले पाहिजे प्रत्येक जिल्ह्यात आदर्श गावांची निर्मिती होऊ शकते. युवाशक्ती राष्ट्र घडवू शकते, असेही प्रा.सदावर्ते यांनी सांगितले.यावेळी छत्रपती संभाजी नगर, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे प्रा. किशोर तापडिया प्रा. योगेश लहामाटे आदि उपस्थित होते, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दुर्गेश काळे यांनी केले. तर आभार सदाशिव उबाळे यांनी मानले. या कार्यक्रमास मांडवा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन







**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन प्रदर्शित केले. विद्यार्थ्यांच्या कलागुण कौशल्यांना व्यासपीठ मिळावे म्हणून स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून ते आपली कला सादर करतात. महाविद्यालयीन जीवनातील आठवणीत राहणारा हा प्रसंग आहे. पंधरा-वीस दिवसापासून विद्यार्थी आपल्या कलागुण कौशल्याची तयारी करत होते. आज सकाळी संगीत शेलापगोटे त्यानंतर पारितोषिक वितरण झाले. त्यानंतरच्या सांस्कृतिक कार्यक्रमात एका पेक्षा एक बहारदार सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आणली. पारितोषिक वितरण प्रसंगी महाविद्यालय संचालक मंडळाचे श्री. अरुणजी अग्रवाल यांची उपस्थिती होती.प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, डॉ. कविता प्राशर, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. क्षमा अनभुले, सांस्कृतिक विभागाचे डॉ. निशिकांत लोखंडे, यांच्यासह विद्यार्थी संसदेचे प्रतिनिधी अर्णव दिवे, प्रणव मस्के, कल्याणी गाडेकर साजिया शेख, नंदिनी दास, अनुष्का सोनसळे, घोडके चव्हाण शुभांगी, अश्रत सय्यद सुलतान, किरण देशमुख, कुणाल काळे, आदित्य काळे, आकांक्षा पगारे, कुणाल काळे, शिवानी परदेशी, निकिता भुतेकर, काजोल सावजी, मातोळे निशा, गौरी कुटे, पल्लवी धनगर, असीम पठाण, योगीराज राठोड यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सुधीर देशपांडे यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ फेब्रुवारी २०२६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार वर्तनात आणला पाहिजे - प्रविण डाळींबकर






**छत्रपती संभाजीनगर :** आपण आजवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भावनिकदृष्ट्या स्विकारले ते गरजेचेही होते पण, आता बाबासाहेबांचा विचार वर्तनात आणला पाहिजे असे मत सिनेअभिनेते प्रविण डाळींबकर यांनी व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात मेत्ता संघाच्या वतीने मूकनायक दिनानिमित्त आयोजित 'आंबेडकरी संवादशास्त्र परिषदे'त ते बोलत होते. ही परिषद दोन सत्रात आयोजित केली होती. उद्घाटनाच्या सत्राचा विषय 'आंबेडकरी पत्रकारिता : प्रतिकार, प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्यायासाठीचे संवादशास्त्र' हा होता. या पहिल्या सत्राचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद हिरोडे होते. सत्रात आंबेडकरी भूमिका मांडता यावी यासाठी स्वतंत्र मिडिया असला पाहिजे असे प्रतिपादन राहूल पगारे यांनी त्यांच्या बातमी मागील सांस्कृतिक राजकारण या विषयावर बोलताना केले. डॉ.स्वर्णमाला मस्के यांनी बहुजन महिलांचे मुख्य प्रवाही पत्रकारितेतील प्रतिनिधीत्व नगण्य असल्याचे आकडेवारीसह स्पष्ट केले. पत्रकारितेचे अभ्यासक यशवंत भंडारे यांनी आंबेडकरांच्या पत्रकारितेचे स्वरूप सांगत आज बहुसंख्याकाचे मुलभूत प्रश्न मांडणारी पत्रकारिता होत नाही, त्यामुळे आंबेडकराच्या पत्रकारितेला अनुसरून पत्रकारिता करण्याची आवश्यकता असल्याचे मत मांडले. ज्येष्ठ पत्रकार शांतीलाल गायकवाड यांनी, मुख्य प्रवाही माध्यमे बदलास अनुकूल नसतीलही मात्र आपण स्वतः मध्ये परिवर्तन घडवले पाहिजे असे मत मांडले.प्रास्ताविक अनुरूप खिल्लारे यांनी केले. सत्राचे सूत्रसंचलन डॉ. राहूल बचाटे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. संजय पाईकराव यांनी मानले.दुसऱ्या सत्राचा विषय 'न्यू मिडिया, कला आणि लोकसंवाद' हा होता. या सत्राचे अध्यक्ष यशवंत भंडारे हे होते. या सत्रात संजना खंदारे यांनी वर्तमानात मुख्य प्रवाही पत्रकारितेचा स्तर ढासळलेला असून नवमाध्यमे चांगले काम करत आहेत. तेंव्हा येणाऱ्या काळात डिजिटल मिडिया तथा नवमाध्यमेच बहुजन महिलांच्या हितासाठी उपयुक्त ठरेल, शिवाय मुख्य प्रवाही माध्यमांचे स्थान घेतील तेंव्हा मुख्य प्रवाही माध्यम दुय्यम ठरतील असे मत व्यक्त केले. प्रा. डॉ. संजय मोहड यांनी आंबेडकरी जलसे, त्यांचा इतिहास, जलस्याचे महत्त्व, जलस्यातील विचारांची आंबेडकरांच्या तत्वज्ञानाशी असलेली सुसंगती आजच्या गीतांमधून येत नाही. 'जल'सा (पाण्यासारखा) वह जलसा' अशी जलस्याची व्याख्या सांगत आंबेडकरी गीत संगीतात वामनदादांच्या रचनांचे महत्त्व स्पष्ट केले. प्रा. डॉ. प्रकाश शिरसाठ यांनी बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः कला शिकण्यासोबतच कलेचा संवादशास्त्राच्या अनुषंगाने पुरस्कार करण्यावर भर दिला. त्यांनी स्वतः चित्रकला, व्हायोलिन शिकण्याचा जो प्रयत्न केला यातून बाबासाहेब चळवळीसाठी कला हे अत्यंत महत्त्वाचे माध्यम मानत असल्याचे स्पष्ट होते. तसेच मानवी मेंदूची मशागत करणे हेच मानवाच्या अस्तित्वाचे ध्येय असायला पाहिजे हाच ब बाबासाहेबांचा विचार होता असे मत मांडले. डॉ. वैशाली बोदेले यांनी लोककलेची आंबेडकरी चळवळीतील भूमिका स्पष्ट केली. डॉ. किशोर वाघ यांनी प्रभुत्ववादी राजकारणाला आंबेडकरी गीत-संगीत हे असहमतीदर्शक असून समता प्रस्थापनेचा त्यात आग्रह असल्याची मांडणी केली. सत्राचे सूत्रसंचलन रत्नदीप रगडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. अर्जुन पटेकर यांनी मानले.परिषद यशस्वी करण्यासाठी डॉ. गौतम पटेकर, गोविंद मोरे, सुमेध नरवडे, यांनी परिश्रम घेतले. परिषदेला मोठ्या संख्येने संशोधक, विद्यार्थी व शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माय माती

माय तुझ्यासाठी आज
काव्यफुलं दोन ओळी
तुझ्यामुळे अंगणात
किती सजली रांगोळी

भोगलेल्या वेदनांची
तुझी लई मोठी गाथा
तुझ्या पवित्र चरणी
झुकवितो आज माथा

माय-माती-शिवाराचं
जन्मोजन्मीचं हे नातं
भेगा भुईला पडता
धग आईच्या काळजात

असं जगणं आईचं
जात्यापाशी गरगर
ओठांतून वेदनेचा
महापूर जन्मभर

नाही टेकलीच कधी
पाठ आईची रानात
इतभर पोटासाठी
झुंज जशी दिसरात

माय उन्हात रापली
स्वप्नं ठेवून मनात
बापासंगे ती लढली
संसाराच्या मैदानात

सारे पावसाळे तिच्या
डोळ्यांमध्ये नांदताना
झळा उन्हाच्या खाऊन
माय दिसे हसताना

पिकातल्या त्या तणाला
माय म्हणते कौरव
पीक हसता रानात
म्हणे हसले पांडव

अशी माय देवभोळी
पांडुरंगाला मानते
माझ्या प्रत्येक शब्दाची
ओवी तिच्यामुळे होते



ज्ञानेश्वर गायके,
कन्नड

# अजित पवारांचा मृत्यू संशयास्पद, उच्चस्तरीय चौकशी करा - संजय राऊत



**मुंबई :** संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर झालेल्या चर्चा सत्रात शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघाताचा मुद्दा उपस्थित करत या विमान अपघाताची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच केंद्र सरकारवर जोरदार आरोप केले.

आज मला अजित पवारांची आठवण येत आहे. त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आम्ही सगळे अजूनही धक्क्यात आहोत, आम्हाला अजूनही कळत नाहीये की हे झाले कसे? अजित पवारांवर ७० हजार कोटींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप सरकारने केला होता. पण ते भारतीय जनता पक्षासोबत आले आणि पवित्र झाले, अशी टीका संजय राऊत यांनी केली.

पुढे संजय राऊत म्हणाले, १५ जानेवारी रोजी अजित पवारांनी एक वक्तव्य केले होते आणि भाजपला उद्देशून म्हटले होते की 'माझ्यावर सिंचन घोटाळ्याचा आरोप करत असाल तर त्यातला पैसा फक्त आम्हीच नाही खाल्ला, भाजपने सुद्धा या घोटाळ्यात पैसा खाल्ला आहे आणि त्यांची फाइल सुद्धा माझ्याकडे आहे'. हे त्यांनी १५ जानेवारी रोजी म्हटले होते आणि १० दिवसांनी अजित पवारांचा विमान दुर्घटनेत मृत्यू झाला. मी आरोप करत नाहीये, पण हा मृत्यू संशयास्पद आहे.

संजय राऊत म्हणाले, अजित पवार हे नेहमी ती फाइल सोबत ठेवत होते. ते जेव्हा मुंबईहून निघाले होते, तेव्हा सुद्धा ती फाइल त्यांच्या सोबत होती. त्यानंतर अर्ध्या तासात त्यांचा मृत्यू होतो. याची चौकशी झाली पाहिजे. आता तर मला जस्टीस लोया यांची सुद्धा आठवण आली आहे. अजित पवारांचा मृत्यू पाहिल्यानंतर जस्टीस लोया यांची आठवण आली, असे म्हणत संजय राऊत यांनी सरकारला आरोप केले. संजय राऊत यांनी संसदेत बोलताना सरकारवर देखील जोरदार आरोप केले. हे सरकार बेजबाबदार आहे. लोकशाही या देशात आता राहिलेली नाही. न्यायालय असो किंवा निवडणूक आयोग या सरकारी कंपन्या बनल्या आहेत. सोनम वांगचूक कुठे आहे? त्यांचा अपराध काय आहे? त्यांनी सांगितले होते की आमची जमीन चीनने घेतली, तर त्यांना राष्ट्रद्रोही ठरवत तुरुंगात टाकले. कुठे आहे लोकशाही? असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना संजय राऊत यांनी 'मनरेगा'च्या मुद्द्यावरून टीका केली. मनरेगाचे नाव तर बदलले, पण रोजगार कुठून आणणार? शेतकऱ्यांना रोजगार मिळायचा, तो तुम्ही बंद केला. मराठवाड्यात २०२५ साली ३ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. हे सरकार भ्रष्टाचाराने व्यापली आहे. देशभरातील भ्रष्टाचारी एकत्र आणतात आणि सरकार बनवतात, तोडतात. आधी नेत्यांना घडवले जायचे, आज नेत्यांना विकत घेतले जात असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# काव्य स्पर्धेत मुकुंदवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**छत्रपती संभाजीनगर :** साहित्य क्षेत्रातील अग्रगण्य नाव असलेल्या काव्य योग काव्य संस्था, पुणे यांच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित विद्यार्थी काव्यलेखन स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथील विद्यार्थिनी हर्षदा नलावडे, अक्षरा कांबळे व कांचन गिरी यांनी आपल्या कविता पाठविल्या होत्या. या तिन्ही विद्यार्थिनींच्या कविता स्पर्धेसाठी निवडण्यात आल्या असून त्यांना सहभाग प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) प्रदान करण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे या सर्व विद्यार्थिनींच्या कविता लवकरच प्रकाशित होणाऱ्या पुस्तकात छापल्या जाणार आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच श्रीमती अर्चना पंडित यांनी विद्यार्थ्यांना काव्यलेखनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

# ग्रामीण भागातील जनतेने महायुतीच्या उमेदवारांना विजयी करावे - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे






**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पार्टीचे सरकार असे पर्यंत लाडकी बहीण योजना चालू राहणार आहे. आत्ता सरकारने लखपती दीदी ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यासाठी तयार झाले असून धाराशिव जिल्ह्यातील सर्व नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील महिलांना लखपती करण्याचा संकल्प करावा. देशातील आणि राज्यातील सरकार शेतकऱ्यांना मोफत वीज देणार असून दिवसा आणि रात्री वीजपुरवठा करून शेती सुजलाम सुफलाम होणार असून ग्रामीण भागातील जनतेनी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.उमरगा-लोहारा तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारार्थ तालुक्यातील कोराळ मोड वर सोमवारी (ता. २) रोजी आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते.या वेळी माजी मंत्री बसवराज पाटील, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगावे, आ. राणा जगजितसिंह पाटील, जिल्हा अध्यक्ष दत्ता कुलकर्णी, मुरूमचे नगराध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, रामकृष्णपंत खरोसेखर, दिलीप भालेराव, संताजी चालुक्य, प्रकाश आष्टे, माधव पवार, रशीद शेख, कैलास शिंदे, शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष मोहन पनुरे, बलभीमराव पाटील आदींसह सर्व उमेदवार उपस्थित होते.पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले की,पंतप्रधान मोदी यांच्या ५५ योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आपल्या भागत येणार आहेत.जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून ओबीसी, एस.सी., बंजारा, मराठा समाजाच्या कल्याणासाठी कमळा समोरील बटन दाबूनविकासाला मतदान करावे असे आवाहन त्यांनी केले. विकसित महाराष्ट्र करण्याचा संकल्प देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. देशातील नरेंद्र मोदी सरकारने एक लाख कोटी रुपये महाराष्ट्र राज्याला देणार असून उमरगा तालुक्यातुन गेलेला राष्ट्रीय महामार्ग हाय स्पीड हायवेला जोडला जाणार आहे. शेतकऱ्यांच्या नदी नाल्यातील वाहून जाणारे पाणी फिरवून आणून शेतकरी बांधवांना देणार आहोतसर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार असून नव्याने स्मार्ट व्हिलेज संकल्पना राबवून ग्रामीण भागाचा कायापालट करणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा नेते शरण पाटील यांनी केले. त्यानीं महसूल विभागाच्या वतीने चालवलेल्या शेत रस्ते योजनेमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठी मदत झाली असल्याचे सांगितले.या वेळी माजी मंत्री बसवराज पाटील म्हणाले की, धाराशिव लातूर हे दोन भावंडे आहेत.या जिल्ह्यात परिषदेच्या अध्यक्ष पदी महायुतीचा अध्यक्ष बसवनार असून पक्षाच्या आदेशानुसार शरण पाटील यांची उमेदवारी मागे घेऊन सर्व सामान्य कार्यकर्त्याला संधी दिली असल्याचे ते म्हणाले. या वेळी आ. राणा जगजितसिंह पाटील यांनी महायुती सरकार मोठ्या ताकदीने काम करीत असल्याचे सांगितले. राज्यात व केंद्रात मोठी विकासाची पर्वणी होत आहे. पायाभूत सुविधेसाठी बारा लाख कोटी निधी मिळणार आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २१ टीएमसी हक्काचे पाणी आणण्यासाठी महायुती सरकारने निर्णय घेतले सात टीएमसीला मंजुरी मिळाली आहे. हे पाणी रामदऱ्यात येणार आहे. तिथून तुळजापूर लोहारा उमरगा तालुक्यात हे पाणी येणार आहे. तुळजापूर देवी मंदिर विकासासाठी दोन हजार कोटी मंजूर झाले आहेत. शिर्डीच्या धर्तीवर विकास होणार असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरण पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शौकत पटेल यांनी केले. सभेपुर्वी माजी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात झाली. फोटो ओळ : मुरूम, ता. कोराळ, ता. उमरगा येथील जाहीर सभेत बोलताना बावनकुळे, बसवराज पाटील, संजय कौडगावे, बापूराव पाटील शरण पाटील व अन्य.